# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ठाणे जिल्ह्यातील मोहने धरणातील पाणी दुषित न होण्याकरिता करावयाच्या उपाययोजनेबाबत

**(१) ८६३४ (०७-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मोहने धरण येथे एम.आय.डी.सी. पाणी उचल ठिकाणी पाणी प्रदुषित करणाऱ्या उल्हासनगर खेमानी नाला अडवुन वाहिनीच्या सहाय्याने पुढे नेवुन सोडल्यास दुषित पाण्याचा प्रश्न सुटू शकतो याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदी व खेमानी नाला यांच्या संगमावर एम.आय.डी.सी. अशुध्द पाणी उदंचन केंद्राच्या ठिकाणी पाणी प्रदुषित करणारा खेमानी नाला अडवून उर्ध्ववाहिनीच्या सहाय्याने मोहना व्हिअरच्या पुढे दुषित पाणी सोडण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदुषण मंडळ व पाटबंधारे विभागाकडून मान्यता मिळाली नसल्याने सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात आला.

त्यानुषंगाने उल्हास नदीजवळ खेमानी नाल्यावर बंधारा बांधून खेमानी नाल्याचे पाणी अडवून संप आणि पंप हाऊसमध्ये घेणे व त्यानंतर उध्दरण वाहिनी टाकणे, शांतीनगर येथे मलशुध्दीकरण केंद्र बांधणे याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्वनिधीतून रु.३२ कोटी इतक्या रकमेच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन १८ महिन्यांच्या कालावधीत काम पूर्ण करणे नियोजित आहे.

सदर काम मे.खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर, नवी मुंबई यांना दिनांक ०८.०२.२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आले असून पुढील काम प्रगतीपथावर आहे.

---

**मुंबईत साथीच्या आजाराचे रुग्ण आढळल्याबाबत**

**(२) २८२२७ (०५-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत स्वाईन फ्ल्युचे २८८ रुग्ण दिनांक १ ऑगस्ट पासून दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत आढळले असून त्यातील १० जणांचा मृत्यू झाला आहे, त्यापैकी ६ जणांचा मृत्यू दिनांक १० ते १६ ऑगस्ट, दरम्यान झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत दिनांक १० ते १९ ऑगस्ट, २०१५ या दरम्यान गॅस्ट्रोचे २२५ रुग्ण आढळले आहेत, याच आठवड्यात मलेरियाचे १७५ रुग्ण आढळले आहेत, तसेच टायफॉईडच्या २५ रुग्णांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वातावरणातील बदलामुळे मुंबईत वेगवेगळे आजार वाढत असून त्यामुळे जनतेमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असल्याने यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

मुंबईत स्वाईन फ्ल्युचे ०१ ऑग्स्ट ते १९ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत ३०७ रुग्ण आढळून आले त्यापैकी १२ रुग्णांचा मृत्यु झाला.

(२) हे खरे आहे.

मुंबईत १० ते १९ ऑबस्ट, २०१५ यादरम्यान गॅस्ट्रोचे २८१, मलेरिया ४८२ व टायफाईडच्या २५ रुग्णाची नोंद झाली आहे.

(३) साथीच्या रुग्णांना औषधोपचार व प्रतिबंध यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करण्यात येते. त्याचप्रमाणे साथीच्या आजारांसाठीच्या मुंबई महानगरपालिकेतर्फे खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :

नियंत्रण कक्ष :- साथीच्या आजाराचे नियंत्रण सर्वेक्षण यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्ष सार्वजनिक आरोग्य खात्याच्या साथरोग विभागात कार्यान्वित आहे. नियंत्रण कक्षात साथ रोगांचा दैनंदिन अहवाल संकलित करण्यात येतो या दैनंदिन अहवालाचे विभागवार विश्लेषण करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक पातळीवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांच्यामार्फत साथीच्या आजाराचे रुग्ण सापडलेल्या विभागात नियंत्रण, प्रतिबंध व उपाययोजना करण्यात येतात.

प्रशासकीय यंत्रणेची सज्जता :- पूरेसे मनुष्यबळ, साधनसामुग्री व औषधसाठी इ. बाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आढावा घेऊन त्यांचे सुयोग्य नियोजन करण्यात येते.

प्रशिक्षण :- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व वैद्यकीय निम्न वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना पावसाळ्यापुर्वी साथीच्या आजाराबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

दैनंदिन सर्वेक्षण :- नियमित घर भेटीद्वारे जलजन्य व किटकजन्य आजाराच्या रुग्णांचा शोध घेण्यात येतो. तसेच प्रतिबंधधात्मक व नियंत्रणात्मक उपचार, घ्यावयाची काळजी, धोक्याची चिन्हे व उपलब्ध सेवासुविधा याबाबत जनजागृती करण्यात येते.

निदान व उपचार व्यवस्था :- साथीच्या रोगांच्या निदान व उपचाराची व्यवस्था महानगरपालिकेच्या रुग्णांलयात व दवाखान्यात उपलब्ध आहेत. याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोचविण्यात येते.

पाणी गुणवत्ता सर्वेक्षण :- बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पिण्याच्या पाण्याचे दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येते व दुषीत पाणी आढळलेल्या विभागात जनजागृती, क्लोरीन गोळ्याचे वाटप व बाधीत रुग्णांना औषधोपचार करण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधून दुषित पाणी पुरवठा असलेल्या विभागात तातडीची उपायोजना करण्यात येते. तसेच फेरीवाल्याकडील पाण्याचे नमुने तपासून दुषित पाणी आढळलेल्या फेरीवाल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन विभागातर्फे कारवाई करण्यात येते.

एकात्मिक किटक व्यवस्थापन :- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या किटक नियंत्रण विभागातर्फे डासोत्पती रोखण्यासाठी विभागवार स्थानिक गरजानुसार उपाययोजना करण्यात येतात.

आंतरविभागीय समन्वय :- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, घनकचरा व्यवस्थापन, बंदर विक्ष्वस्त या विभागाशी समन्वय साधण्यात येतो.

आरोग्य शिक्षण :- जनतेने साथरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कोणती खबरदार घ्यावी तसेच साथरोगांवरील निदान व उपचाराची सुविधा कोठे उपलब्ध आहे यासंदर्भातील महत्वाचे संदेश, वृत्तपत्र, टी.व्ही.चॅनल्स, रेडीओ, बसेस व रेल्वे मार्फत जाहिराती अशा विविध माध्यमातून देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील शासनाच्या व महापालिकेच्या विविध विभागांसाठी आरक्षित असलेल्या मोकळ्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढत असल्याबाबत**

**(३) ३८१७५ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शासनाच्या व महापालिकेच्या विविध विभागांसाठी आरक्षित असलेल्या मोकळ्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश ठिकाणच्या भूखंडांवर राडा-रोडा, कचरा, छोटी-मोठी अतिक्रमणे होत असल्याने त्या भूखंडांच्या मूळ आकारमानात बदल होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) पुणे व पिंपरी चिंचवड यांचेकडील प्राप्त माहितीच्या आधारे अशी बाब महापालिकेच्या निदर्शनास आलेली नसल्याचे दिसून येते.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे अशी बाब महापालिकेच्या निदर्शनास आलेली नाही. भूमी संपादनाच्या माध्यमातून किंवा टिडीआरच्या माध्यमातून महापालिकेकडे ताब्यात येणाऱ्या जागांना सिमाभित बांधून अतिक्रमणे होणार नाहीत याची दखल महापालिका स्तरावर घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांदिवली (पूर्व) स्टेशन परिसर फेरीवाल्यांनी व्यापले असल्याबाबत**

**(४) ४०४८० (१३-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पूर्व) स्टेशन परिसर फेरीवाल्यांनी व्यापल्याने वाहतुकीच्या गंभीर समस्या, भांडणे, चोऱ्या अशा अनेक प्रकार घडत असल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, जागरूक नागरिक याचेकडून प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी साधनसामग्री कमी असल्याचे स्थानिक वरिष्ठ अधिकारी यांचेकडून सांगण्यात येऊन कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरीवाल्यांवर कायमचे निर्बंध बसविण्यासाठी प्रशासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(४) तसेच, कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, जागरुक नागरिक यांचेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.०५.२०१६ ते १५.०६.२०१६ या कालावधीत फेरीवाल्यांवर अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात येऊन त्यांच्याकडून रुपये एक लाख पंचवीस हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचया आर/दक्षिण विभागामार्फत उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर करुन सदर ठिकाणी वेळोवेळी अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आली आहे.

(३) गर्दीच्या वेळी सदर स्टेशन परिसर फेरीवाला मुक्त रहावा याकरिता महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी सकाळ व संध्याकाळ सत्रात १ अतिक्रमण निर्मुलन वाहनासह अधिकारी व कर्मचारी यांचे गस्त पथक ठेवण्यात येते.
(४) सदर ठिकाणी अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई वेळोवेळी करण्यात येत असल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कांदिवली (पूर्व) येथील ठाकूर संकुल मध्ये अल्प उत्पन्न गटातील लोकांना घरे बांधून दिली नसल्याबाबत**

**(५) ४०४८१ (१३-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (पूर्व) येथील ठाकूर संकुलमध्ये अल्प उत्पन्न गटातील लोकांना घरे बांधून देण्यासाठी असलेल्या भूखंडावर विडीओकोन विकासकाने १BHK, २BHK सारखे flat बनवून लोकांना विकले तसेच सदर इमारतींचे महानगरपालिकेने निरीक्षण केले असता अल्प उत्पन्न गटासाठी लहान घरे नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने इमारतीमध्ये राहणाऱ्या सर्व रहिवाशांना लहान खोल्या जोडून मोठे flat बनवले असल्याच्या दोषाखाली नोटीसा पाठविल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्यक्षात पाहता विकासकानेच अल्प उत्पन्न गटासाठी लहान flat बांधलेच नव्हते व याबाबत रहीवाशांना अंधारात ठेवून ते त्यांना विकले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेने रहीवाशांना पाठविलेल्या नोटीसा या महानगरपालिका अधिकारी व विकासक यांच्या संगनमताने पाठविल्या आहेत असा रहिवाशांचा आरोप आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर विकासकाची व रहीवाशांना पाठविलेल्या नोटिसांची शासन चौकशी करणार आहे काय,
(६) असल्यास, चौकशीनुषंगाने रहिवाशांना पाठविलेल्या नोटीसा खारीज करणार येणार आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.०८.२०१३ रोजी निरीक्षण केले असता, तेथे मंजुर आराखड्यामध्ये दर्शविलेल्या सदनिकांचे अनधिकृत एकत्रीकरण निदर्शनास आले होते.
(२) हे खरे आहे.

कांदिवली (पूर्व) येथील ठाकुर संकुलातील व्हिडीओकॉन टॉवर्समधील “ए” विंगमधील ८९ व ''बी'' विंगमधील ८९ अशा एकूण १७८ सदनिकाधारकांवर त्यांच्या सदनिकांचे एकत्रीकरण केल्याप्रकरणी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३४७ सी अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

सदर बांधकामास महानगरपालिकेमार्फत पूर्णत्वाचा दाखला देण्यापूर्वी, दिनांक १०.१२.२००३ रोजी तळमजला अधिक २३ माळ्यांच्या दोन इमारतींना निवासी प्रमाणपत्र पारीत करण्यापूर्वी केलेल्या स्थळ निरीक्षणानुसार इमारतीतील सदनिकांची स्थिती मंजुर आराखड्यानुसार होती.

(४) व (५) व्हिडीओकॉन टॉवर्स या इमारतीला दिनांक १०.१२.२०१३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यानंतर सन २०१३ मध्ये महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार स्थळ पाहणी केली असता, तेथील इमारतीत मंजुर नकाशाप्रमाणे प्रत्येक विंगमध्ये १७८ सदनिका असणे आवश्यक असतांना प्रत्येक विंगमध्ये फक्त ८९ सदनिका आढळल्या.

सदर इमारतीत केलेले हे सर्व फेरफार/बदल मंजुर नकाशाशी विसंगत असल्यामुळे सबंधित सदनिकाधारकांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३४७ सी अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या.

सदर कारवाई विरोधात सदनिकाधारकांनी मा.उच्च न्यायालयात दावे दाखल केले असून, सदर दावे मा.न्यायालयात प्रलंबित आहेत.

(६) व (७) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) नगरपालिका येथील रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत**

**(६) ४०५१९ (१३-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे सुरु असणाऱ्या रस्त्याच्या केवळ ८०० मीटर खडीकरणाच्या कामासाठी पावणेपाच कोटी रुपये खर्च करण्यात आले असून काम निकृष्ट प्रतीचे झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार सदर ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, रस्त्याचे काम दर्जेदार होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर रस्त्याची त्रयस्थ तांत्रिक तपासणी शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर यांचेकडून करण्यात आली आहे.

(३) शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर यांचेकडून आलेल्या पाहणीचे निष्कर्ष समाधानकारक आहेत. तद्नुसार ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) रस्त्याचे काम दर्जेदार होणेसाठी श्रीगोंदा नगरपरिषदेकडून संशोधन अधिकारी, जिल्हा प्रयोगशाळा अहमदनगर यांचेकडून बांधकाम साहित्याची वेळोवेळी चाचणी करुन घेण्यात येते. तसेच त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात येते.

---

**मुंबईमध्ये दम्यासारख्या श्वसनाच्या विकारांबरोबरच क्षय रोगाची मोठ्या प्रमाणात लागण होत असल्याबाबत**

**(७) ४०५६५ (१३-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये मोकळा श्वास घेण्यासाठी जागा शिल्लक राहिलेली नसल्याने धकाधकीचे जीवन जगण्यात दम्यासारख्या श्वसनाच्या विकारांबरोबरच क्षय रोगाची मोठ्या प्रमाणात लागण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्या असाध्य रोगांपासून मुक्त होण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत क्षयरोगाला आळा घालण्यासाठी क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :

**<u>क्षयरोग व औषध प्रतिरोधी क्षयरोगाच्या त्वरीत निदानासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे</u>**

संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या ५७ क्षयरोग चिकित्सालये, १३४ मान्यताप्राप्त सुक्ष्मदर्शी केंद्रे, ४ कल्चर डीएसटी प्रयोगशाळा, २० जीन एक्सपर्ट प्रयोगशाळा, ९ डीआर टी.बी. उपचार केंद्रे व ९३२ कम्युनिटी डॉट प्रोव्हायडर्सद्वारे क्षयरुग्णांना मोफत निदान व औषधोपचार करण्यात येतात.

**<u>प्रभावी उपचारांच्या उपलब्धतेसाठी सुधारणा करणे</u>**

* टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समार्फत टी.बी. च्या समुपदेशनासाठी २७ समुपदेशक नेमण्यात आले आहेत.

*शिवडी टी.बी. रुग्णालयामध्ये क्षय रुग्णांसाठी १००० व औषध प्रतिरोधी क्षय रुग्णांसाठी २०० खाटांची सोय उपलब्ध आहे.

*बेडाक्युलीन कंडीशनल ॲक्सेस कार्यक्रम (बेडाक्युलीन अटीसापेक्ष कार्यक्रम) च्या अंतर्गत बेडाक्युलीन हे नवीन औषध अटीसापेक्ष उपलब्ध करण्यात आहे. हे औषध मुंबई ७ विभागातील १०० अत्यंत औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांसाठी वापरण्यात येणार आहे.

**इतर प्रकल्प**

*मुंबईतील गोवंडी सारख्या क्षयरोगाचा अतिप्रादुर्भाव असलेल्या क्षेत्रात एम.एस.एफ. या अशासकीय संस्थेच्या समन्वयाने औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांसाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

* मुंबईतील क्षयरोगाबाबत अतिसंवेदनशील असलेल्या १२ विभागांमध्ये अशासकीय संस्थांच्या मदतीने मे, २०१६ पासून घरोघरी भेट देऊन संशयित क्षयरुग्णांचे त्वरीत निदान करण्यात येत आहे.

* सर्वोदय रुग्णालय, घाटकोपर या खाजगी रुग्णालयात औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांना बाह्यरुग्ण व अंत रुग्ण सेवा नव्याने उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन उपचार केंद्र लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

* किरकोळ औषध विक्रेते यांच्यामार्फत संशयित क्षयरुग्णांना निदानासाठी मार्गदर्शन करणे व औषधांच्या दुकानांमध्ये क्षयरोग संदेशाची भित्तीपत्रके व माहितीपत्रके प्रदर्शित करण्यासाठी त्यांच्या सहभागाकरिता माहितीपर कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई झोपडपट्टीतील अग्निशमन केंद्राबाबत**

**(८) ४११७५ (०५-०५-२०१६). अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पूर्वेकडील दामू नगर वस्तीत सोमवार दि. ७ डिसेंबर,२०१५ रोजी दुपारी गॅस सिलेंडरमुळे भडकलेल्या आगीत पाच हजार चौरस मीटर परिसरातील दोन हजाराहून अधिक झोपड्या जळाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलेपार्ले मुंबई येथील संभाजी नगर, तलाई पाडा, इंदिरा नगर अशा विमानतळाच्या सभोवतालच्या झोपडपट्टी परिसरातही गॅस सिलेंडरचे साठे असल्यामुळे आगीचा धोका उद्भवल्यास झोपडपट्टीतील छोट्या गल्ली बोळात जाऊन आग विझवू शकतील अशा अग्निशमन वाहनांची तसेच अग्निशमन केंद्राची स्थापना अद्यापही झालेली दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, अशा प्रकारच्या झोपडपट्ट्यांतील अरुंद ठिकाणी आग विजविण्याकरिता अग्निशमन दलामध्ये १७ क्युक रिस्पॉन्स मल्टिपर्पस वाहने खरेदीकरिता महापालिकेमार्फत पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच ३ मिनी फायर टेंडर खरेदी करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे.

तसेच, सदर वाहने ठेवण्याकरिता छोट्या अग्निशमन केंद्राच्या बांधणीची योग्य ती कार्यवाही महापालिकेमार्फत सुरु आहे.

---

**सांगली येथील कुपवाड रस्त्यावरील कृषी औषध विक्रीच्या दुकानात विनापरवाना कृषी औषधे विक्रीस ठेवल्याबाबत**

**(९) ४२६९२ (१६-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील कुपवाड रस्त्यावरील बालाजीनगर येथे कृषी औषध विक्रीच्या दुकानात विनापरवाना कृषी औषधे विक्रीस ठेवल्या प्रकरणी दोघांवर संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक सांगली यांचे फिर्यादीवरुन संजयनगर पोलीस ठाणे, सांगली येथे तारा ॲग्रोसर्व्हिसचे मालकासह २ आरोपीविरुध्द गु.र.नं.९/२०१६, अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ (२) (a)(d) तसेच किटकनाशक कायदा १९६८ चे कलम ३ (k), ९ (१), ९(३-b), ९ (४), १३(१), १७(a), १७(b), १८(a)(c) व किटकनाशक नियम १९७१ चे नियम क्र.६(१), ९ (१), १० (१), १० (४-A) (i), १५ (२), १६, १७ (१), १८, १९ (iii), १९ (३) (४) (७) प्रमाणे दि.०६/०१/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळावरुन जप्त केलेल्या जैवीक किटकनाशकाचे नमुने विश्लेषक किटकनाशक तपासणी प्रयोगशाळा, पुणे व जैविक खताचे नमुने खत तपासणी प्रयोग शाळा, कोल्हापूर येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून प्राप्त अहवालानुसार विक्री करण्यात येत असलेले जैवीक खते व किटकनाशके विहित मानकाप्रमाणके नसल्याचे आढळून आले आहे.

तंत्र अधिकारी गुणनियंत्रण व्दारे विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर यांनी सदर तारा ॲग्रो सर्वीसेस यांचा किटकनाशक व खत कंपनीचा विक्री परवाना रद्द केला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## पुण्यातील वाहतुक समस्या सोडविण्याबाबत

**(१०) ४२७६५ (०३-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी महत्वाच्या ठरणाऱ्या १७० कि.मी. च्या महत्वाकांक्षी रिंगरोडच्या पहिल्या टप्प्याचे सर्वेक्षण अंतीम टप्यात असून लवकरच दुसऱ्या टप्प्याच्या सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लिंक रोडच्या दुसऱ्या टप्प्याचे सर्वेक्षण करण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पाडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :**

(१) व (२) सदर रिंग रोड १९ वर्षापूर्वीच १९९७ च्या प्रादेशिक विकास योजनेत ९० मीटर इतक्या रुंदीस मंजूर करण्यात आला होता. तथापि तेव्हापासून १८ वर्षे करण्यात त्यावर अंमलबजावणीची कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती. तथापि आता पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण दि.३१/०३/२०१५ रोजी स्थापना झाल्यानंतर प्राधिकरणाने अत्यंत तातडीने कार्यवाही करुन त्याची अंमलबजावणीची प्रक्रिया सुरु केली आहे. सन २०१३ मध्ये या रिंग रोडच्या आखणीत अंशत: बदल करण्यात आला होता. तथापि पुणे शहराची वाढती लोकसंख्या व इतर अडचणीचा विचार करता सदर रिंग रोडची रुंदी ११० मीटर व त्याच्या आखणीत अंशत: बदल प्रस्तावित करण्यात आला. त्यानुसार सद्य:स्थितीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २०(३) अन्वये शासनाने नागरिकांचया सुचना/हरकती मागविल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर नगरपरिषदेला स्वतंत्र अनुदान देण्याबाबत

**(११) ४२८५१ (०३-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर नगरपरिषद हद्दीत वारंवार साथीचे रोग व नैसर्गिक आपत्ती उद्‌भवत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेला यासाठी स्वतंत्र अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सागळ तसेच वळण पिप्री ( जि.अहमदनगर) येथील नदीपात्रात विनापरवाना वाळू उपसा करणा-या तस्करांना पकडल्याबाबत

**(१२) ४३२७२ (२४-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सागळ (जि.अहमदनगर) येथे नदीपात्रात विनापरवाना ट्रक्टर व ट्रॉली, एक डंपर व एका व्यक्तीस वाळू तस्करी करीत असताना राहूरी पोलीसांनी पकडले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, तसेच, वळण पिप्री येथील मुळा नदीपात्रात विनापरवाना वाळू उपसा करणा-या तस्करांवर राहूरी पोलीस व तहसिलदार यांनी छापा टाकून पाच मोटर सायकल, डंपर व वाहनचालक यांना ताब्यात घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाळू तस्करांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :** (१) व (२) सागळ येथे नदीपात्रात विनापरवाना ट्रॉली व एक ढंपर व एका व्यक्तीस वाळू तस्करी करीत असताना पकडण्यात आलेले नाही. तसेच मौजे पिंपरी वळण येथे अवैध वाळू वाहतूक हात असलेबाबत माहिती मिळाल्याने तहसिल कार्यालय राहुरी येथील गौण खनिज विरोधी पथक पोलीसांसह नदी पात्रात गेले असता तेथे कोणी आढळून आले नाही. दरम्यान रेकी करीत असल्याच्या संशयावरुन ५ मोटार सायकल स्वाराना ताब्यात घेण्यात आले त्यापैकी २ शेतकरी असल्याने त्यांना सोडू देण्यात आले. उर्वरित तीन मोटार सायकलस्वार रेकी करीत असल्याचे आढळून आले असता त्यांना परत रेकी करणार नाही व वाळू उत्खनन व वाहतूक करणा-यांना माहिती पुरवणार नाही असे जबाब नोंदवून तोंडी ताकीद देवून सोडून देण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**हडपसर-हवेली (जि.पुणे) महानगरपालिका स्थापन करण्याबाबत**

**(१३) ४३४६८ (०७-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी हडपसर-हवेली साठी स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करण्याबाबतचा ठराव मांडण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चा ठराव एक महिना पुढे ढकलण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका हद्दी लगतच्या ३४ गावांसह पुर्व भागासाठी हडपसर-हवेली स्वतंत्र महापालिका स्थापन करण्यासंदर्भात शासनाने माहे मार्च, २०१५ मध्ये पुणे महानगरपालिकेकडुन अभिप्राय मागितला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हडपसर-हवेली स्वंतत्र महानगरपालिका स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. पुणे महानगरपालिकेच्या मुख्यसभेच्या माहे जुलै, २०१५ च्या कार्यपत्रिकेवर सदरच्या विषयावर दिनांक ३०.११.२०१५ रोजी चर्चा झाली.

(२) होय. दिनांक ३०.११.२०१५ रोजी झालेल्या चर्चेमध्ये सदरचा विषय एक महिना पुढे ढकलण्यात आला.

(३) होय.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर विचार विनिमय सुरू आहे.

---

**मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड प.शिवदास चापसी मार्ग येथील पुल बांधकामाबाबत**

**(१४) ४४२१२ (०७-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड प.शिवदास चापसी मार्ग येथील १३६ वर्षे जुना ब्रिटीश कालीन, माझगांवला जोडण्यात आलेला रेल्वे पुल मोडकळीस आल्याने, दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी तोडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासन, महापालिका आणि रेल्वे विभागाच्या समन्वयाने बांधण्यात येत असलेल्या पुलाच्या बांधकामासाठी एकूण किती रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे व किती कालावधीत सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, माझगांव, विक्रीकर विभाग (सेल्स टॅक्स) बिल्डींग, डोंगरी आणि जे जे परिसरातील लाखो नागरीकांना वळसा घालुन रहदारी करण्यास होत असलेला त्रास विचारात घेता सदरहू पुलाचे बांधकाम अत्याधुनिक तंत्राच्या आधारे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६)** :(१) सदर पुल दिनांक ९ व १० जानेवारी, २०१६ रोजी रेल्वेमार्फत तोडण्यात आला आहे.
(२) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात सदर पूल आणि इतर कामांकरिता एकूण रू.७७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(३) सदर परिसरातील लोकांना होणारा त्रास कमी करण्याकरिता प्रि-फॅब्रिकेटेड स्टील स्ट्रक्चरद्वारा पुलाची पुनर्बांधणी प्रस्ताविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी येथील गैबीनगर ताज कंपाऊंड येथे कामगाराला विद्युत शॉक लागल्याने मृत्यू झाल्याबाबत**

**(१५) ४४६८८ (०७-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी येथील गैबीनगर ताज कंपाऊंड येथे अजिम शेठ यांच्या यंत्रमाग कारखान्यात काम करणा-या मुक्या कामगाराला विद्युत शॉक लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामगारांच्या मृत्यूस जबाबदार असणा-या यंत्रमाग कारखान्याच्या मालकावर शासनाने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने मृत कामगारांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्याबाबत व सदर मृत्यूस जबाबदार असणा-या कारखान्यातील मालकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (१९-०९-२०१६)** : (१) होय, हे खरे आहे. दि.६/१२/२०१५ रोजी गैबीनगर, ताज मोहम्मद कंपाऊंड, भिवंडी, जि.ठाणे येथील यंत्रमाग कारखान्यात एका कामगाराचा विजेच्या धक्क्याने मृत्यु झाला.
(२) सदर घटनेची अपघाती मृत्यु (अ.मृ.र.नं.११९/२०१५) अशी नोंद शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे करण्यात आली आहे.

(३) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कल्याण व विद्युत निरीक्षक, कल्याण यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये असे आढळून आले की, यंत्रमाग चालविणाऱ्या कामागाराचा विद्युत मोटरच्या सचेत भागाशी स्पर्श झाल्याने विजेचा धक्का लागून त्याचा मृत्यु झाला. सदर कारखाना बेकायदेशीररित्या विनापरवाना चालू असल्याचे आढळून आल्याने तसेच ह्या घटनेची माहिती विहीत वेळेत न दिल्यामुळे भोगवटीदाराविरूध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत दोन फौजदारी खटले दाखल करण्यात येत आहे. मृत कामगाराच्या वारसास रू.१,००,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात आला आहे. तसेच नुकसान भरपाईबाबत आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे. त्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**एरंडोल (जि.जळगांव) येथील अंजली धरणात काठेवाडी समाजाच्या पाच महिला बुडाल्याबाबत**

**(१६) ४६२७४ (२४-०५-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल (जि.जळगांव) येथील अंजली धरणात कपडे धुण्यासाठी गेलेल्या काठेवाडी समाजाच्या पाच महिला बुडाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर महिलांच्या कुटुंबियांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दि २३.१.२०१६ रोली एरंडोल येथील अंजनी धरणावर / तलावावर पाच महिला कपडे धुण्यासाठी गेल्या असता त्यातील एक महिला पाण्यात पडल्याने तिला वाचविण्यासाठी इतर चार महिला पाण्यात उतरल्या परंतु त्यांना पोहता येत नसल्याने पाचही महिला पाण्यात बुडूण मरण पावल्या आहेत. या प्रकरणी एरंडोल पोलीस ठाणे येथे २/२०१६ फौ. दं.प्र.सं. कलम १७४ प्रमाणे नोंद घेण्यात आली असून मयत महिलांच्या मृत्यूसंदर्भात त्यांचे नातलग वा अन्य कोणीही संशय व्यक्त केलेला नाही. सदर प्रकरणी कोणताही घातपाताचा प्रकार निदर्शनास आलेला नाही.

मयत महिलांच्या कुटुंबियांना अद्याप आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. तथापि, मुख्यमंत्री सहायता निधीमधून आर्थिक मदत मिळण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील जलकुंभाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ४६६२७ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील जलकुंभाची कामे निविदा प्रक्रिया रखडल्याने गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलकुंभाची कामे रखडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर जलकुंभाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेमार्फत ७ जलकुंभांच्या कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असून त्यांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मनिष मार्केट इमारत धोकादायक झाल्याबाबत

**(१८) ४७०५० (०५-०५-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मनिष मार्केटची इमारत धोकादायक झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर इमारतीची दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) अशा प्रकारची बातमी दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १५ जानेवारी, २०१६ मनिष मार्केटची इमारतीची पाहणी केली असता, इमारत धोकादायक स्थितीत असल्याचे आढळून आले नाही.

सदर इमारतीला दिलांक २८.०३.२०१६ रोजी महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५३५(ब) अन्वये स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती.

सदर इमारतीच्या संदर्भात स्ट्रक्चरल इंजिनियर श्री.एम.एन.हिरा यांनी दिनांक २३.०५.२०१२ रोजी महानगरपालिकेस पाठविलेल्या पत्रात, मनिष मार्केट या इमारतीत लागलेल्या आगीमुळे इमारतीच्या छतीग्रस्त झालेल्या भागाची दुरुस्ती करण्यात आल्याचे व सदर इमारतीसाठी करण्यात आलेली भार चाचणीचे निष्कर्ष समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिंतूर नगरपरिषद (जि.परभणी) आणि बिल्कॉन कन्सलटन्सी परभणी यांनी शहरामधील विविध कामे करण्याकरिता केलेला करार

**(१९) ४७९९१ (०५-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर नगरपरिषद (जि.परभणी) आणि बिल्कॉन कन्सलटन्सी परभणी यांनी शहरामधील विविध कामे करण्याकरिता करार केले असून एजन्सीने केलेल्या करारानुसार कामे केलेली नाहीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, परभणी, जिंतूर नगरपरिषद यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सदर बिल्कॉन एजन्सीचे काम संथगतीने सुरू असून पूर्ण झालेले नाही. काम करण्यास होणाऱ्या विलंबा बाबत वेळोवेळी नोटीस देऊन काम पूर्ण करण्यास सुचित केलेले आहे.

---

**पुण्यात विविध योजनेच्या माध्यमातून पुणे महापालिकेच्या ताब्यात असलेल्या ९ हजार सदनिका वापराविना पडून असल्याबाबत**

**(२०) ४८२१२ (१६-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात विविध योजनेच्या माध्यमातून पुणे महापालिकेच्या ताब्यात असलेल्या ९ हजार सदनिका वापराविना पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर इमारतींचा वापर करून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी, म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :**(१), (२) व (३) नाही.

मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे विकास आराखड्यातील तरतुदीप्रमाणे आर-७ (R-७) व इतर आरक्षण अंतर्गत एकूण २४४८ सदनिका प्राप्त असून पुनर्वसनाअंतर्गत १२१४ सदनिकांचे वाटप केले आहे. उर्वरीत १२३४ सदनिका चाळ विभागाच्या मागणीप्रमाणे महानगरपालिका वसाहतींचे बांधा वापरा व हस्तांतरीत (BOT) करा या तत्वावरील प्रकल्पासाठी महानगरपालिकेच्या वसाहतीत राहणाऱ्या सेवकांच्या पुनर्वसनासाठी चाळ विभागाला उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा शहरात (जि.जळगांव) हायमॉस्ट लॅम्प व सिग्नल व्यवस्था सुरळीत चालू करण्याबाबत**

**(२१) ५०७२० (०७-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा शहरात (जि.जळगांव) नगरपालिकेने लाखो रुपये खर्च करुन लावलेले हायमॉस्ट लॅम्प बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील शिवाजी चौक, महाराणा प्रताप चौक, जारगाव चौफुली, कृष्णापूरी चौफुली, जळगाव चौफुली येथे लाखो रुपये खर्च करुन सिग्नल व्यवस्था कार्यान्वित केली होती परंतु ती व्यवस्था बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हायमॉस्ट लॅम्प व सिग्नल व्यवस्था सुरळीत चालू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.

शहरातील हायमस्ट लॅम्पची नियमित देखभाल, दुरुस्तीची कार्यवाही केली जाते. हायमस्ट दिव्यांसह इतर पथदिवे ९५ ते ९८ टक्के नियमित सुरु आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

सिग्नल व्यवस्था संपुर्णत: बंद आहेत. शहरातील व शहराबाहेरील जाणाऱ्या चौकांमध्ये सुमारे १२ वर्षापूर्वी सिग्नल यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली होती. तथापी रस्त्यांचे रुंदीकरण झाल्याने सद्यस्थितीत सिग्नल यंत्रणा कार्यान्वित नाही.

(३) हायमॉस्ट लॅम्प कार्यानिव्त राहतील याबाबत नगरपरिषद स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि सिग्नल यंत्रणा नव्याने उभारणे आवश्यक असून त्याकरीता निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदेने नमूद केले आहे. तथापि सिग्नल यंत्रणा सुरु करण्यासंदर्भात नगर परिषदेने स्वनिधीतून तरतूद करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घरेलू कामगार सन्मानधन व इमारत बांधकाम कामगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत नोंदणी झालेले अर्ज गेले दोन वर्षापासून मंजुरीसाठी प्रलंबित असलेबाबत

**(२२) ५३१२४ (१७-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात शासनाकडून जाहीर असलेल्या घरेलू कामगार सन्मानधन व इमारत बांधकाम कामगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत नोंदणी झालेले जिल्ह्यातील सुमारे १७ हजार कामगारांचे अर्ज गत दोन वर्षापासून मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना सन्मानधन व अर्थसहाय्य देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२१-१०-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही. महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात ८९०३ इतके घरेलू कामगार नोंदीत आहेत. त्यापैकी सन्मानधन योजनेंतर्गत प्राप्त ५४३६ अर्जापैकी पात्र १४९९ कामारांना प्रत्येकी रु. १०,०००/- प्रमाणे एकूण रु. १,४९,९०,०००/- इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत ३९३७ सन्मानधन अर्जात त्रूटी आढळून आल्याने ते अपात्र झालेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात इमारत व बांधकाम अर्थसहाय्य योजनेखाली १२७५२ कामगारांना रु. ३००० या प्रमाणे रु. ५२,५६,०००/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले असून त्याशिवाय ८१९४ अर्ज अर्थसहाय्य वाटपासाठी प्राप्त झाले असून त्यांची छाननी सूरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या लॅपटॉपसाठी देण्यात आलेला निधी परत काढून घेण्यात आल्याबाबत**

**(२३) ५३६७१ (२३-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या लॅपटॉपसाठी शासनाने ३१ मार्च, २०१६ रोजी रात्री ९ वाजून ४० मिनिटांनी दोन कोटी ३५ लाखांचा निधी जमा केला गेला व त्याच रात्री १० वाजता तो काढून घेण्यात आल्याची बाब दिनांक २१ एप्रिल २०१६ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) वित्त विभागाच्या दि.३१.०३.२०१६ च्या पत्रानुसार बीम्स प्रणालीमार्फत अनुदान प्राधिकृत करुन देयके प्राधिकारपत्र काढण्याची मुदत दिनांक ३१.०३.२०१६ ला रात्री १०.०० वाजेपर्यंत होती. मा.उच्च न्यायालयाने सादर केलेल्या ४१७ लॅपटॉपच्या रु.२,३५,२३,०५३/- इतक्या रकमेच्या खरेदी प्रस्तावास वित्त विभागाने दिनांक ३१.०३.२०१६ ला मान्यता दिली. त्यानुसार दिनांक ३१.०३.२०१६ ला शासन निर्णयही काढण्यात आला पण ही कार्यवाही होईपर्यंत वरीलप्रमाणे विहित मुदतीत संगणक वितरण प्रणालीनुसार रात्री १०.०० पर्यंत निधीचे वितरण करता आले नाही,

वित्तीय वर्ष सन २०१६-१७ मध्ये सदरचा निधी दिनांक ०२.०५.२०१६ च्या ज्ञापनान्वये मा. उच्च न्यायालयास उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

**खारघर से.नं.३३, नवी मुंबई मधील नाल्यात मलःनिस्सारणाचे पाणी थेट उघडयावर सोडण्यात येत असल्याबाबत**

**(२४) ५३७३२ (२९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर से.नं.३३, नवी मुंबई मधील नाल्यात मलःनिस्सारणाचे पाणी थेट उघडयावर सोडण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दूषित पाण्यामुळे जवळच असलेल्या पेठ गावात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात तेथील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सिडको प्रशासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१), (२), (३) व (४) यासंदर्भात संबंधित ग्रामस्थानी एप्रिल २०१६ मध्ये केलेल्या विनंती अर्जाची दखल घेवून तातडीने मलनि:स्सारण वाहीनी टाकून उघड्यावर गळती होत असलेले सांडपाणी बंद वाहीनीमार्फत एप्रिल, २०१६ मध्ये प्रवाहीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धानोरा तालुक्यातील (जि. गडचिरोली) खामतळा जयसिंगटोला मार्गावर नक्षलवाद्यांनी दोन जणांची हत्या केल्याबाबत**

**(२५) ५३८३२ (२३-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा तालुक्यातील (जि. गडचिरोली) खामतळा जयसिंगटोला मार्गावर नक्षलवाद्यांनी दोन जणांची दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास हत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणामध्ये नक्षल आरोपींनी मृतक १) गांगसु बुद्द कुमोटी व २) मतकुरशहा सनकु होळी हे पोलीस खबरे असल्याच्या कारणावरुन त्यांना मारहाण करुन त्यांची हत्या केली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पुराडा अप.क्र.१२/२०१६ कलम ३०२, ३६४, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भा.दं.वि. सह ३/२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून फरार नक्षल आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या महाधिवक्त्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(२६) ५३८७९ (२३-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची प्रकरणे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात मांडण्यासाठी आवश्यक असलेले महाधिवक्ता हे पद अनेक दिवसांपासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये सरकारला कायदेशीर सल्ला देणे तसेच सरकारचे निर्णय कायदेशीर पातळीवर उतरविणे यासाठी महाधिवक्त्यांची मदत होत असल्याने महाधिवक्त्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) नाही,

(२) श्री.श्रीहरी अणे यांचा महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, या पदाचा राजीनामा शासनाने दिनांक २३.०३.२०१६ च्या अधिसूचनेनुसार स्वीकृत केला असून सदर पदावर श्री.रोहित देव यांना प्रभारी महाधिवक्ता म्हणून नियुक्ती देण्यात आली असल्यामुळे महाधिवक्ता पद भरण्याची कार्यवाही केली आहे,

(३) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**नागपूर शहरातील त्रिभुवनदास भिमजी जव्हेरी लि. च्या संचालकाने धनराज तुळशीराम खापर्डे यांची फसवणूक केल्याबाबत**

**(२७) ५३९९१ (२५-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील त्रिभुवनदास भिमजी जव्हेरी लि. च्या संचालकाने काटोल मार्ग निवासी धनराज तुळशीराम खापर्डे यांचे ४६ लाख २८ हजार रूपयाचे दागिणे तारण ठेवण्याच्या उददेशाने फसवणूक केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उपरोक्त संचालकाविरूध्द सदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फसवणूक झालेल्या फिर्यादीला त्यांचे दागिने परत करण्यात आले आहे काय,

(४) तसेच उपरोक्त संचालकाविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी फसवणूक झलेल्या फिर्यादीला १६५३ ग्रॅ सोन्यापैकी ४६५ ग्रॅम सोने परत दिले आहेत व रु. २,६०,०००/- व्याज फिर्यादीचे सिंडीकेट बँक गिट्टी खदान नागपूर शहर येथील खात्यात जमा केले.
(४) फिर्यादीस त्रिभुवनदास भिमजी जव्हेरी लि.कंपनीच्या स्किमप्रमाणे तारणाचे व्याजाचे पैसे व सोने कंपनीच्या संचालकाने परत न करता मुद्देमालाच्या अपहार करुन न्यायभंग केला अशा फिर्यादीच्या तक्रारीवरुन तीन आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन सदर, नागपूर शहर येथे अपराध क्रमां १४७/२०१६ कलम ४०६, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात मा.जिल्हा न्यायाधीश पहीले व अतिरिक्त सत्र न्यायाधीश्, नागपूर यांचे आदेशान्वये आरोपीतांना अटकपूर्ण जामिन मिळाल्याने आरोपीतांना अटक करण्यात आली नाही.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान यातील फियादी व आरोपी यांच्यात समझोता होवून फियादीस १६५३ ग्रॅम सोन्यापैकी ४६५ ग्रॅम सोने परत दिले व २,६०,०००/- रु व्याज फिर्यादीचे सिंडीकेट बँक, गिट्टी खदान, शाखा नागपूर शहर येथील खात्यात जमा केले आहे. गुन्हा तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जिल्हा ठाणे) शहरातील १०० डेज बारवर छापा टाकण्यात आल्याबाबत**

**(२८) ५४०२० (२३-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जिल्हा ठाणे) शहरातील कॅम्प नं.४ येथील विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत श्रीराम चौक येथील १०० डेज बार विहित वेळेपेक्षा जास्त वेळ सुरु ठेवून गिऱ्हाईकांना आकर्षित करणाऱ्या ९ बारबालांसह व्यवस्थापक, तीन गिऱ्हाईके व तीन वेटर अशा १६ जणांवर पोलिसांनी छापा टाकल्याचे दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी विरुध्द पोलिसांनी पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण १६ आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईत अस्थमा रुग्णांच्या संख्येत तीस टक्कयांनी वाढ झाल्याबाबत**

**(२९) ५४१३७ (२९-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत देवनार, कांजूरमार्ग, व मुलुंड येथील मुंबई महापालिकेच्या कचरा क्षेपणभूमीला अधूनमधून लागणाऱ्या आगीमुळे नवी मुंबईत अस्थमा रुग्णांच्या संख्येत तीस टक्कयांनी वाढ झाल्याची बाब दिनांक ३ मे, २०१६ रोजी स्थानिक महापालिका रुग्णालयातील डॉक्टरांनीच उघडकीस आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबईतील नागरीकांच्या आरोग्याच्या गंभीर प्रश्नासंदर्भात शासन कोणती उपाययोजना राबविणार आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, नेरुळ व ऐरोली येथील सार्वजनिक रुग्णालये आणि बेलापूर येथील माता बाल रुग्णालय, तसेच महानगरपालिका क्षेत्रातील २१ नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना नियमित आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवनारमधील कचरा भूमीच्या संरक्षक भिंतीचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३०) ५४३६४ (२९-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवनारमधील कचरा भूमीच्या संरक्षक भिंतीचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागाने पुर्ण केले आहे काय,

(२) असल्यास, सदर संरक्षण भिंतीच्या कामाचा अहवाल मा.मुख्यमंत्र्यांना आयुक्त, महानगरपालिका यांनी सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात संरक्षण भिंतीबाबतच्या त्रुटींचाही उल्लेख करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अहवालातील त्रुटींचे स्वरुप काय आहे व त्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) देवनार कचराभूमीच्या (क्षेपणभूमी) दगडी संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीचे काम, सद्य:स्थितीत भिंतीवरील लोखंडी खांब व काटेरी तारेचे कुंपण वगळता पुर्ण झाले आहे.

सदर कचराभूमीच्या दगडी संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीचे उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(२) सदर संरक्षण भिंतीच्या कामाचा अहवाल आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सादर केलेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेनटाकळी (ता.मेहकर, जि. बुलढाणा) येथे ४० वर्षीय इसमाचा संशयास्पदरित्या मृत्यू झाल्यानंतर १७ दिवसांनी मृतदेह उकरुन शवविच्छेदन करण्यात आल्याबाबत**

**(३१) ५४५९१ (२३-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनटाकळी (ता.मेहकर, जि. बुलढाणा) येथे बल्लाळी (ता.बाळापूर) येथील ४० वर्षीय इसमाचा संशयास्पदरित्या मृत्यू झाल्यानंतर १७ दिवसांनी मृतदेह उकरुन शवविच्छेदन करण्यात आल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचा मुलगा रा.शिराळा ता.खामगाव जि.बुलडाणा ह.मु. बल्हाडी ता.बाळापुर जि.अकोला याचा दि. ०७/०४/२०१६ रोजी पेनटाकळी येथे मृत्यू झाला व दि.८/४/२०१६ रोजी मृतकाचे वडील व नातेवाईकांनी मृतक यास बल्हाडी, ता.बाळापूर, जि.अकोला येथे नेवून दफनविधी करुन अत्यंतसंस्कार करण्यात आल्यानंतर मृतकाचे वडीलाला मृत्यू बद्दल संशय आल्याने दि. १७/४/२०१६ रोजी पोलीस स्टेशन साखरखेर्डा येथे मुलाचा मृत्यू घातपाताने झाल्याबाबत रिपोर्ट दिला त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी बाळापूर जि.अकोला यांचेसोबत पत्रव्यवहार करुन त्यांचेकडुन दफनविधी केलेले प्रेत उकरून पंचनामा करण्यात आला तद्नंतर प्रेताचा व्हिसेरा व केसाचे, मातीचे नमुने सि.ए.तपासणीसाठी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा औरंगाबाद येथे पाठविले आहे. मृतकाचा पी.एम. रिपोर्ट प्राप्त झाल्यावरुन पोलीस स्टेशन, साखरखेर्डा येथे दिनांक १४/५/२०१६ रोजी मर्ग क्रमांक १०/२०१६ कलम १७४ जाफौ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. मृतकाचा मृत्यूबाबतचा सि.ए.अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायदेशीर कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांबाबत

**(३२) ५४६११ (२९-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली मधील २७ गावांना महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आले आहे, परंतु या २७ गावांच्या पायाभूत व मुलभूत सुविधांकडे महानगरपालिका प्रशासनाने लक्ष न दिल्यामुळे या गावांत पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या २७ गावांना पायाभूत व मुलभूत नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) दि.०१/०६/२०१५ पासून उक्त २७ गावांचा समावेश कल्याण-डोंबिवली महानगपालिका क्षेत्रात करण्यात आला आहे.

या गावांत रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती, साफसफाई, शौचालय बांधकाम, पाणीपुरवठा इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने टेंबलाई टेकडीवर (जि.कोल्हापूर) बांधलेले भक्त निवास आणि दुकानगाळे वापराविना पडून असल्याबाबत

**(३३) ५४७६० (२३-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च करुन टेंबलाई टेकडीवर (जि.कोल्हापूर) बांधलेले भक्त निवास आणि दुकानगाळे वापराविना पडून असल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भक्त निवास व दुकानगाळे वापराविना पडून असल्याने इमारतीची अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,

परंतू टेंबलार्ड टेकडीवर (कोल्हापूर) बांधलेले भक्त निवास हे देवस्थान समितीने बांधले नसून 'ब' वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत निधीतून बांधण्यात आलेले आहे. त्याकरीता देवस्थान

समितीने कामाचा २५ % हिस्सा दिला आहे. या भक्त निवास, दुकानगाळयाचे बांधकाम व इतर कामे कोल्हापूर महानगरपालिकेने केली आहेत,
(२) भक्त निवास व दुकानगाळे वापराविना पडून आहेत, परंतु इमारातीची दुरावस्था झालेली नाही,
(३) समितीने दि.२०.०८.२०१६ रोजी ठराव करुन भक्त निवास वापरात आणणे करीता व दुकानगाळे भाडे तत्वावर देणेसाठी कार्यवाही सरु केलेली आहे,
(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**बाहे (ता. रोहा जि.रायगड) गावाच्या हद्दीत जप्त करण्यात आलेल्या गुटखाबाबत**

**(३४) ५५२४० (२३-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाहे (ता. रोहा, जि.रायगड) गावाच्या हद्दीतील निर्जनस्थळी दिनांक २४ मे, २०१६ रोजी सहाय्यक पोलिस निरिक्षक (एपीआय) श्री.मेश्राम यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धाड टाकून लाखो रूपयांचा गुटखा जप्त केला असून गुटखा बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनरी जप्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोहा परिसरात मोठया प्रमाणात गुटख्याची अवैध विक्री करणारे रॅकेट सक्रीय आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध गुटखा बनविणे व विक्री प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील बाहे गावाच्या हद्दीत घडलेल्या घटनेबाबत रोहा पोलीस, ठाणे येथे तीन आरोपीविरूध्द गु.र.नं. ११७/२०१६ भादंविस कलम ४२०, १८८, २७३, १७९, ३४ अन्न सुरक्षा व मानके कायदा ०६ व नियम २०११ चे अंतर्गत कलम २६(२) (i) २६(२) (iv), २७(३) (d), ५९ (iii) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणातील तीनही आरोपींना अटक करून जामिनावर मुक्त केले आहे. तसेच सदर आरोपीत यांचेविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे, गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**खनिज विकास निधी अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील प्राकलनांची कार्यान्वयन यंत्रणा बदलणेबाबत**

**(३५) ५५५३० (२९-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खनिज विकास निधी अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील विकास कामांना खनिकर्म विभागाने उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. एसडीएफ ०३१६/प्रक्र २३(१)/उदयोग-९ मंत्रालय मुंबई दिनांक २० एप्रिल, २०१६ नुसार प्रशासकीय मान्यता दिली असुन, यातील अनेक कामे हे बांधकाम विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर या यंत्रणेच्या नावे मंजूर करण्यात आली होती सदर यंत्रणा बदलून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड (पुर्वीचे रोहयो सा.बां.चंद्रपूर) यांच्याकडे वर्ग करून तसे आदेश निर्गमित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्र क्र. विव/ब्रम्ह/१३७९/२०१६ दिनांक २३/५/२०१६ रोजी मा.राज्यमंत्री खनिकर्म यांना दिले असता मा.राज्यमंत्री यांनी त्या निवेदनावर शेरा मारुन संबंधित विभागास पाठविले असता सदर विभागाने व्यवस्थापकीय संचालक म.रा.खनिकर्म महामंडळ, नागपूर यांचा नावे दिनांक ३१/५/२०१६ रोजी पत्र काढून माहिती मागविण्याच्या नावांनी सदर प्रस्ताव हेतूपुरस्पर प्रलंबित ठेवण्यात आला असल्याची माहिती माहे ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१६ च्या दरम्यान खनिज विकास निधी अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील अनेक कामांना खनिकर्म विभागाने बांधकाम विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या नावे मंजूरी दिल्यांनतर सुध्दा लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावरून खनिकर्म विभागाने अहवाल न मागविता बांधकाम विभाग जि.प.चंद्रपूर ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांच्या नावे यंत्रणा बदलून तसे आदेश माहे एप्रिल २०१६ च्या सुमारास निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खनिकर्म विभागाने चंद्रपूर जिल्हयातील एकाच विषयाच्या प्रकरणात दोन वेगवेगळया भुमिका घेण्याचे कारण काय आहे,

(४) असल्यास, खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांनी लोकप्रतिनिधीच्या पत्रावरून अहवाल न मागविता ज्या प्रमाणाने चंद्रपूर जिल्हयातील यंत्रणा बदलून माहे एप्रिल २०१६ च्या सुमारास आदेश निर्गमित केले आहे त्याच पध्दतीने दिनांक २३/५/२०१६ रोजी लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर कार्यवाही करुन बांधकाम विभाग जि.प.चंद्रपूर ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड पुर्वीचे रोहयो सार्वजनिक बांधकाम चंद्रपूर यांच्या नावे प्राकलनांची कार्यान्वयन यंत्रणा बदलविण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

खनिज विकास निधी अंतर्गत शासनाने दिनांक २०/०४/२०१६ रोजी शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या कामापैकी जिल्हा परिषद बांधकाम विभाग चंद्रपूर या विकास यंत्रणेत बदल करुन सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड

या विकास यंत्रणाद्वारे प्रशासकीय मान्यता न.प्रदान करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यामुळे शासनाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंढळाकडे याबाबत चौकशी करुन दिनांक ०६/०८/२०१६ व १०/०८/२०१६ रोजी सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड या विकास यंत्रणेमार्फत करणेबाबतची प्रशासकीय मान्यता निर्गमित केलेली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे सदर कामांना निविदा पूर्व निधी म्हणून १० % निधी सुध्दा वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) खनिज विकास निधी मंजूर केल्यानंतर जिल्हा स्तरावरील कार्यान्वयण यंत्रणा बदलणे बाबतची विनंती वारंवार होत असल्याने त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी व महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांचेकडून अहवाल मागवून निर्णय घेण्यात आला.

(४) शासन निर्णय दि.०६/०८/२०१६ व १०/०८/२०१६ द्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग नागभीड या विकास यंत्रणेमार्फत करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे सदर कामांना निविदा पूर्व निधी म्हणून १०% निधीसुध्दा वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नक्षलग्रस्त भागात टेहळणी करण्यासाठी विमान खरेदी करण्याबाबत**

**(३६) ५५५५५ (२३-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नक्षलग्रस्त भागात टेहळणी करण्यासाठी गृह विभाग विमान खरेदी करणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमान खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथे समाजकल्याण विभागाच्या नावाने कार्यालय चालवून बेरोजगारांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(३७) ५५९७६ (२४-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील मार्डी मार्गावरील राजुरा नाका येथे समाजकल्याण विभागाच्या नावाने कार्यालय चालवून विविध पदांची जाहिरात प्रसिध्द करुन बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या समाजकल्याण कार्यालयावर दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास गुन्हे शाखेच्या पोलीसांना छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन पाच आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, गाडगे नगर, जि.अमरावती येथे अप.क्र.३३६/२०१६ कलम ४२०, १२०ब, ४६५, ४६७, ४६८, ४६९, ४७१, ४७२, ४७४, ४७५ भा.दं.वि. सहकलम ६६(ड) आय.टी ॲक्ट व ३,४,७ राष्ट्रीय मानचिन्ह गैरवापर कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाचही आरोपींना अटक करुन नंतर जमिनावर सोडण्यात आले आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये गुन्ह्यातील आरोपी यांनी नोकरी लावून देण्याकरिता दिलेले नियुक्तीपत्र लेटरपॅड (ज्यावर राष्ट्रीय मानचिन्हाचा वापर करण्यात आलेला आहे.) जप्त करण्यात आले तसेच नोकरी लावून देण्याकरीता फसवणूक झालेल्या इसमाकडून घेतलेली रक्कम ज्या बँक खात्यात आरोपींनी जमा केली आहे ती बँक खाते संबंधित बँकाना पत्र देवून सिल करण्यात आली आहेत. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील कळमनूरी नगरपरिषदेला महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीबाबत

**(३८) ५६२५१ (२९-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कळमनूरी नगर परिषदेला नागरी दलित्तोतर वस्त्यांमध्ये सुधारणा करण्याकरिता व महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत प्राप्त होणारे सव्वा दोन कोटीचे अनुदान नियोजन विभागातील कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामुळे दिनांक ३१ मार्चला बी.डी.एस.टाकले न गेल्याने प्राप्त होऊ शकले नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील नियोजन विभागातील कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६)** :(१) व (२)

- नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना व महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या जिल्हास्तर योजना आहेत.
- सन २०१५-१६ मध्ये हिंगोली जिल्हयास नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना व महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हस्तर) या दोन योजनाखाली प्रत्येकी रू. २०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध होती.
- पुनर्विनियोजनानंतर नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजनेसाठी रू.१७० लक्ष तर महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेसाठी रू.१५० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध झाली.
- नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजनेसाठी उपलब्ध रू.१७० लक्षचा संपूर्ण निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आहरित करण्यात आला. सदर निधीचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी कळमनूरी नगरपरिषदेस रू. २६.५२ लक्षचे वाटप करण्यात आले आहे.
- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेसाठी उपलब्ध रू.१५० लक्षपैकी रू.९८.८८ लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आहरित करण्यात आला. त्यापैकी कळमनूरी नगरपरिषदेस रू.३८.९७२ लक्षचे वाटप करण्यात आले.
- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेखालील उर्वरित रू.५१.१२ लक्ष निधी दि.३१.०३.२०१६ रोजी बी.डी.एस. प्रणालीद्वारे आहरित करताना तांत्रिक अडचणीमुळे आहरित होऊ शकला नाही.
- जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या अहवालानुसार तांत्रिक अडचणीमुळे निधी आहरित व वितरित झाला नसल्यामुळे त्यास कोणीही वैयत्किक जबाबदार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई, महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त, अधिक्षक (वसुली अधिकारी), सहाय्यक लेखाधिकारी यांना बडतर्फ केल्याबाबत**

**(३९) ५७३७२ (२९-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, महानगरपालिका आयुक्तांनी ऐरोली विभाग कार्यालयाच्या क्षेत्रात सन २०१२ ते २०१५ या काळात १५ लाख रुपयांच्या महसूलाचा अपहार केल्याप्रकरणी दोन सहाय्यक

आयुक्त, अधिक्षक (वसुली अधिकारी), सहाय्यक लेखाधिकारी अशा चार जणांना बडतर्फ केले असल्याचे दिनांक २७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बडतर्फ केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेजवळ ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त असलेल्या संपत्तीची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१०-२०१६) :**(१) नाही, या प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेकडून संबंधित चारही अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले.
(२) नाही.
(३) या प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेकडून संबंधितांवर पुढील कारवाई करण्यात आली आहे.

- महसूलाचा भरणा स्विकारणाऱ्या लिपिकाच्या सेवा संपुष्टात आणण्यात आल्या आहेत.
- या प्रकरणी अपहार झालेली रु. १५,३६,७१२/- एवढी रक्कम संबंधितांकडून वसूल करुन घेण्यात आली आहे.
- या प्रकरणी जबाबादार असलेल्या पर्यवेक्षिय अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत विभागीय चौकशी करण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर कामगारांना सोयी-सुविधांचा लाभ देण्याबाबत

**(४०) ५८२१९ (२३-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने मंदीराची व्यवस्था पाहण्यासाठी तीनशे कर्मचारी आहेत त्यापैकी केवळ ८० कर्मचारी कायम तर १३८ कर्मचारी हंगामी आणि ८३ कर्मचारी मानधनावर असून या कामगारांना कोणत्याही शासकीय सोयी-सुविधांचा लाभ मिळत नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कामगारांना सोयी-सुविधांचा लाभ देण्याबाबत वा शासन सेवेत सामवून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने मंदिर व्यवस्था पाहण्यासाठी ७८ कायम कर्मचारी, १३७ हंगामी कर्मचारी आणि ८१ कर्मचारी मानधनावर काम करीत आहेत, श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीवरील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे,

(२) श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदीरे समितीवरील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र चित्रपट रेग्युलेशन ॲक्टमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(४१) ५८८५२ (०५-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र चित्रपट रेग्युलेशन ॲक्टमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू सुधारणा करण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) होय,

(२) महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ मध्ये नियम २४ I (१) मध्ये मिनीप्लेक्स (व्हिडओथिएटर) इमारतीच्या तळमजल्यावरच असावे अशी तरतूद आहे. तसेच नियम २४ I (३) मध्ये आसन क्षमता ७५ इतकी निश्चित करण्यात आली आहे. व्हिडीओ थिएटरच्या आसन क्षमतेची मर्यादा ७५ ऐवजी १५० करणेबाबत व व्हिडीओ थिएटर इमारतीच्या तळमजल्यावर असावे ही अट रद्द करण्याबाबत सुधारणा प्रस्तावित करण्यात आली असून सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे,

(३) व (४) कार्यवाही सुरु आहे.

---

**वांद्रे, मुंबई येथील कामगार न्यायालयात असलेली न्यायाधीशांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४२) ५९४९३ (२९-०८-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पुर्व) येथील कामगार न्यायालयात ३ न्यायाधीश कार्यरत असून ९ न्यायालये न्यायाधिशांच्या नियुक्ती शिवाय असल्याची बाब माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींबाबत विविध लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२४-१०-२०१६) :**(१) दिनांक ३१/०५/२०१६ रोजी मुंबई येथील कामगार न्यायालयामध्ये न्यायाधीशांची ६ पदे रिक्त होती.
(२) होय.
(३) व (४) शासन अधिसूचना क्र आयसीई-०६१०/प्र.क्र.६१/कामगार-६, दि.३०/०७/२०१४ अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या संमतीने कामगार व औद्योगिक न्यायालयाच्या न्यायाधीशांचे सेवाप्रवेश नियम विहीत केलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमानुसार कामगार व औद्योगिक न्यायालयातील न्यायाधीशाच्या नियुक्त्या व बदल्या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेद्वारा केल्या जातात.

सदर सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्यातील कामगार न्यायालयातील न्यायाधीशांची रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक प्रक्रिया दि.३०/०१/२०१५ च्या जाहीरातीद्वारे सुरु केली हाती. सदर प्रक्रियेअंतर्गत मा.उच्च न्यायालयाने दि.३०/०८/२०१६ व दि.०२/०९/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मुंबई येथील कामगार न्यायाधीशांच्या रिक्त जागांवर नामनिर्देशानाने नियुक्ती केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार संबंधित न्यायाधीशांच्या पदस्थापनेचे आदेश औद्योगिक न्यायालय, मुंबई यांचे कार्यालयाकडून दि.०२/०९/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत व त्या आदेशानुसार संबंधित न्यायाधीशांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

---

## पाचवड (ता.वाई,जिल्हा सातारा) येथे लैंगिक अत्याचाराचा आरोप ठेवून जात पंचायतीने वडील व मुलीला मारहान केल्याबाबत

**(४३) ५९५७० (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचवड (ता.वाई, जि. सातारा) येथे लैंगिक अत्याचाराचा आरोप ठेवून वडील व मुलीला दोरीने बांधून गोपाळ समाजाच्या जात पंचायत समितीने काठीने अमानुषपणे मारहाण केल्याचे दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी भुईज पोलिस ठाण्याच्या पोलिसांकडे या प्रकाराची व्हीडीओ क्लिप सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येतआहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी दि. ४.३.२०१६ रोजी भुईज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५५/२०१६ भादंवि कलम ३२४, ३८६, १२० (ब), ३२३, ३४ बाल न्याय सुधारीत अधिनियम २०१५ चे कलम ७५ प्रमाणे जात पंचायतीतील एकूण ७ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील ७ आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा नगरपरिषदेने केलेली बेकायदा करवाढ**

**(४४) ५९९५७ (२६-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा नगरपरिषदेने दिनांक ३१ मार्च, २०१५ वा त्या सुमारास सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासुन दुपटीने करवाढ केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर करवाढ प्रक्रीया ही विहित प्रक्रीयेचा अवलंब न करता तसेच नागरिकांचे आक्षेप-हरकती विचारात न घेता करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर करवाढीबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून नागरिकांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडे दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ही बेकायदा केलेली करवाढ रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) बुलढाणा नगरपरिषदेने स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन पाणीपट्टी दरामध्ये प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेसाठी १५% लोकवर्गणी शासनास भरण्यासाठी म्हणून वाढ केली आहे. तथापि, मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.
(२) नाही.

(३) व (४) बुलढाणा नगर परिषदेने कराच्या दरात वाढ करण्यास मान्यता दिलेल्या सर्व साधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.१ तहकुब करण्याबाबत श्री.भिमराव वानखेडे व इतर यांनी दि.०८/०३/२०१६ अन्वये महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ३०८ अन्वये दाखल अपिल जिल्हाधिकारी यांचे स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मराठी चित्रटांच्या पायरसीबाबत

**(४५) ५९९६० (२३-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी चित्रपटांच्या पायरसीचा प्रश्न निर्माण झाला असून डाऊनलोडिंग करणारे टोरंट हे संकेतस्थळ भारतीय तपास यंत्रणाना दाद देत नसतांना स्थानिक पातळीवरुन होणाऱ्या पायरसीचा शोध घेण्यातही मुंबई पोलिसांना यश येत नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पायरसींबाबत धोरण बनविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. मराठी चित्रपटाबाबत पायरसी झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) व (३) मराठी चित्रपटाच्या पायरसीच्या अनुषंगाने ७ गुन्हे नोंदविण्यात आले असून १२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच रु.१०,०५,३००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

---

### नवी मुंबईतील विमानतळाच्या उभारणीसाठी सिडकोमार्फत निविदा काढल्याबाबत

**(४६) ६०००० (२६-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील विमानतळाच्या उभारणीसाठी सिडकोमार्फत फेब्रुवारी, २०१४ मध्ये जागतिक स्तरावर निविदा काढण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त काढण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने एकुण किती निविदा प्राप्त झाल्या व त्यापैकी किती कंपन्यांच्या निविदा पात्र ठरल्या आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी अंतिम निविदा निवड करुन प्रत्यक्षात विमानतळाच्या बांधकामास केव्हा सुरुवात होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१६) :** (१) होय.
(२) पूर्व अर्हतेकरीता (RFO) चार बोलीदारांनी अर्ज सादर केले होते. चारही निविदाकरांना अर्हताधारक म्हणून मान्यता दिली असून बोली प्रक्रियेस (RFP टप्प्यात) सहभागी होण्यास पात्र केले आहे.
(३) अंतिम निविदा निवड डिसेंबर, २०१६ पर्यंत अपेक्षीत असून विकासकाद्वारे प्रत्यक्षात विमानतळाच्या बांधकामास मार्च, २०१७ मध्ये सुरुवात अपेक्षीत आसहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील 'महात्मा गांधी स्मारक निधी' या न्यासातील विश्वस्तांच्या चुकांमुळे न्यासाच्या भूखंडावर अनधिकृत झोपड्या उभ्या राहिल्याबाबत

**(४७) ६०१५४ (२३-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९९३ मध्ये पुणे येथील 'महात्मा गांधी स्मारक निधी' नोंदणी क्र.: एफ २९० (पुणे) या न्यासाला लागवड करण्यासाठी पुण्यातील एक लाख चौरस मिटरची जागा १ रुपया नाममात्र भाड्यावर ३० वर्षासाठी दिलेली असतांना संबंधित विश्वस्तांनी योग्य ती काळजी घेतली नसल्यामुळे उक्त जागेवर २८८ अधिकृत झोपड्या उभ्या राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महालेखापालांच्या अहवाल क्रमांक ५/२०१३ मध्ये आक्षेप घेण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय भूखंडावर अनधिकृत झोपड्या उभ्या राहण्यामागे न्यासातील विश्वस्त सर्वश्री कुमार सप्तर्षी, अण्णा हजारे आणि माजी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी हे जबाबदार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी झालेल्या नुकसानीस न्यासाचे विश्वस्त जबाबदार असल्यामुळे त्यांच्याकडून या नुकसानीची भरपाई करून न्यासाच्या विश्वस्तपदावरून दूर करण्याची मागणी काही संघटनांकडून दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

---

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१६) :** (१) सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय, पुणे या कार्यालयात महाराष्ट्र गांधी स्मारक निधी नोंदणी क्र.एफ-२९० पुणे या न्यासाचे उपलब्ध परिशिष्ट-१ चे निरिक्षण केले असता, या न्यासाला लागवड करण्यासाठी पुण्यातील एक लाख चौरस मीटरची जागा १ रुपया नाममात्र भाड्यावर ३० वार्षसाठी दिलेबाबतची नोंद आढळून येत नाही. तथापि सदर बाबत धर्मादाय सह आयुक्त, पूणे यांनी कार्यालयातील निरिक्षकामार्फत चौकशी केली असता, प्रश्नांकित जागा १ रुपया नाममात्र भाडयावर ३० वर्षासाठी देण्यात आल्याबाबतचा कोणताही भाडे करार (लीज करार) झालेला नाही. सदर जागा चतु:सीमा दाखवून दगड रोवून नियामानुसार संस्थेच्या ताब्यात दिलेली नाही. त्यामुळे विश्वस्तांच्या सदर जागेची काळजी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही आणि सदर जागेवर विश्वस्तांनी काळजी न घेतल्यामुळे २८८ झोपड्या उभ्या राहिल्या आहेत हे म्हणणे चुकीचे आहे.

(२) मा.महालेखापालांचा अहवाल धर्मादाय आयुक्त म.रा. मुंबई यांच्या अधिपत्या खालील कार्यालयास प्राप्त झालेला नाही,

(३) मा. अण्णा हजारे हे सन १९८५ ते २००१ या काळात संस्थेची विश्वस्त होते. परंतु ते संस्थेचे पदाधिकारी नव्हते तसेच डॉ.कुमार सप्तवर्षी, मा.श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी हे त्यामुळे सदर विश्वस्त या विषयाशी जबाबदार असल्याचा प्रश्न उभ्दवत नाही,

(४) उपरोक्त प्रकरणी नुकसानीस न्यासाचे विश्वस्त जाबाबदार असल्यामुळे त्यांच्याकडून या नुकसानाची भरपाई करुन न्यासाच्या विश्वस्त पदावरून दूर करण्याची मागणी काही संघटनांकडून दि.२३.०१.२०१६ रोजी व त्या सुमारास धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्याकडे करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरातील गृहप्रकल्पाच्या बांधकामाबाबत

**(४८) ६०८६९ (२९-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरात दोन एकर जागेवर उभारण्यात येत असलेल्या गृहप्रकल्पाच्या एकूण बांधकाम क्षेत्रफळाविषयी दिशाभूल करणारी माहिती महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी हरित न्यायाधिकरणाकडे प्रतिज्ञापत्राद्‌वारे दिल्याचा प्रकार माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळमजला, तीन मजली वाहनतळ आणि त्यावर सहा मजले बांधकाम होईपर्यंत विकासकाने पर्यावरण परवान्यासाठी अर्ज केला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) होय. सदर गृहप्रकल्पाचे विकसक यांनी पर्यावरण नाहरकत पत्र प्राप्त करुन पुणे महानगरपालिकेकडे सादर कले नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी मा.हरित लवाद पुणे बेंन्च येथे अर्ज क्र.२२/२०१६ दाखल असून मा.हरित लवाद यांनी दि.२४/०२/२०१६ रोजी दिलेल्या अदेशानुसार सदर प्रकल्पाचे काम थांबविणेत आले आहे. सद्य:स्थितीत सदर अर्ज मा.हरित लवाद यांचेकडे प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करवीर निवासिनी अंबाबाईदेवी देवस्थानाच्या मालकी हक्कातील आठ एकर जमिनीची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत**

**(४९) ६२०४० (२३-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीतील करवीर निवासिनी अंबाबाई देवीच्या मालकी हक्कातील आठ एकर जमिनीची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आली असून त्यात गैरव्यवहार, अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याप्रकरणी एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी प्रजासत्ताक सामाजिक सेवा संघटनेने माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल मागविण्यात आला असून कार्यवाही सुरु आहे,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा येथे युवतीवरील बलात्कार प्रकरणी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारास अटक पूर्व जामीन मिळाल्याबाबत**

**(५०) ६३५१९ (२३-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा शहर पोलीस ठाणे येथे दिनांक १५ जून, २०१६ रोजी एफ आय आर नं. १५५/१६ कलम ३७६(१) नुसार २१ वर्षीय युवतीवर करण्यात आलेल्या बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्याचार पिडीत युवतीने आरोपीचा मोबाईल क्रमांक, पत्ता व नोकरी करण्याचे ठिकाण सूचित करुन पोलिस अधिका-यांकडे वारंवार याचना करूनही आरोपीस अटक करण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून दिनांक २२ जून रोजी आरोपीस अटक पूर्व जमीन मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणातील पिडीत युवती व आरोपी हे नातेवाईक असून, आरोपीने पिडीत युवतीस लग्नाचे आमिष दाखवून एक वर्ष आपले घरी ठेवले व वारंवार बलात्कार केला. दि. १५.६.२०१६ रोजी आरोपीने पिडीत युवतीस लग्न करण्यास नकार दिल्याने पिडीत युवतीच्या तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे अप.क्र.१५५/१६, कलम ३७६(१), ४१७ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

आरोपीने मा.सत्र न्यायालयात जामीन अर्ज सादर केले होते. आरोपीस जामीन मिळू नये म्हणून प्रतिज्ञापत्र सादर केल्याने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला. परंतु आरोपीने मा.उच्च न्यायालया जामीन अर्ज केला असता जामीन अर्ज नाकारण्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे परंतु आरोपीस अटक पूर्व जामीनबाबतचे अंतिम निर्णय होणे बाकी आहे. आरोपीस जामीन मिळू नये यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. प्रकरण मा.उच्च न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.